# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.08.2024** **वारःशुक्रवार**

---

1. राष्ट्रपति द्रौपदी मूर्मू 2 दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर
2. बांगलादेशात हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ महंमद युनूस यांणी घेतली शपथ
3. आगामी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर, देशात आजपासून हर घर तिरंगा अभियान आणि
4. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेकपटू नीरज चोप्राची रौप्य पदकाला गवसणी; तर भारतीय पुरुष हॉकी संघाला कास्य पदक

**<u>राष्ट्रपति न्यूझीलंड</u>**

राष्ट्रपति द्रौपदी मूर्मू 2 दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर असून आज त्या ऑकलंड मध्ये एक कार्यक्रमादरम्यान प्रवासी भारतीयांशी संवाद साधणार आहेत. न्यूझीलंड मध्ये सध्या जवळपास 3 लाख अनिवासी भारतीय राहत असून ते भारत आणि न्यूझीलंड दरम्यान संवाद सेतुचं काम करत असल्याचं राष्ट्रपति मुर्मू यांनी म्हटलं आहे. दोन्ही देशांचे राजकीय संबंध सुदृढ करण्याच्या हेतूनं भारत, ऑकलंड आणि भारतादरम्यान एक वाणिज्य दुतावासाची निर्मिती करणार असल्याचं राष्ट्रपतींनी राजकीय मेजवानी प्रसंगी जाहीर केलं.

**<u>शपथ</u>**

बांगलादेशात हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून काल नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ महंमद युनूस यांनी शपथ घेतली. बांगलादेशाचे राष्ट्रपति महंमद शाहबुद्दीन यांनी त्यांना ढाका इथ वंग भवन इथ पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी विविध देशांचे प्रतिनिधी  उपस्थित होते. महंमद युनूस यांचा जन्म 28 जून 1940 रोजी झाला. ते बांगलादेशातील नामवंत उद्योगपती, बँकर आणि अर्थतज्ञ आहेत. ग्रामीण बँकेची स्थापना करून सूक्ष्म पातळीवर कर्ज आणि अर्थपुरवठा याबाबत त्यांनी केलेल्या कार्याबद्दल 2006 मध्ये त्यांचा नोबेल पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला होता.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महंमद युनूस यांच अभिनंदन केल असून शुभेच्छा दिल्या आहेत. बांगलादेशातील परिस्थिती लवकरात लवकर सामान्य होऊन तिथल्या हिंदू आणि इतर अल्पसंख्यांक नागरिकांना सुरक्षितता बहाल होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. तसच दोन्ही देशादरम्यान विकास, शांती आणि सुरक्षेसंदर्भात  काम करण्यासाठी भारत कटिबद्ध आहे असही पंतप्रधान मोदी यांनी आपल्या समाज माध्यमांवरील संदेशात म्हंटल आहे.

**<u>हर घर तिरंगा</u>**

आगामी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर, देशात नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आजच्या ऑगस्ट क्रांति दिनापासून ते 15 ऑगस्ट पर्यन्त देशभरात हर घर तिरंगा अभियान राबवण्यात येणार आहे. या दरम्यान नागरिकांनी आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा आणि त्याबरोबर सेल्फी घेऊन तो फोटो हर घर तिरंगा संकेतस्थळावर अपलोड करावा, अस आवाहन केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी केल आहे. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या अभियानाची माहिती देताना शेखावत म्हणाले की, 2022 साली स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या अभियानाची सुरुवात झाली, त्याला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. मागील वर्षी 10 कोटी पेक्षा जास्त नागरिकांनी तिरंग्या बरोबरचा आपला फोटो

संकेतस्थळावर पाठवला होता. यावर्षी या अभियाना दरम्यान देशभरात सुमारे 200 सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आल असून, येत्या 13 ऑगस्ट रोजी दिल्लीत संसदेतील खासदार आणि केंद्रीय मंत्र्यांचा सहभाग असलेली तिरंगा बाईक रॅली ही काढण्यात येणार आहे, अस ही शेखावत यांनी सांगितल. दरम्यान, ऑगस्ट क्रांती दिनाचं औचित्य साधून मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज महाराष्ट्रातल्या हर घर तिरंगा मोहिमेला प्रारंभ होणार आहे.

**वक्फ विधेयक**

वक्फ कायदा 1995 मध्ये सुधारणा करण्यासाठी वक्फ-सुधारणा विधेयक 2024 संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी काल लोकसभेत सादर केलं. या विधेयकाद्वारे राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. जेडीयू आणि शिवसेनेने या विधेयकाला पाठिंबा दर्शवला असून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, समाजवादी पक्ष आणि एआयएम या पक्षांनी विधेयकाला विरोध दर्शवला आहे. हे विधेयक आता संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं आहे. भारतीय वायुयान विधेयक 2024 देखील काल लोकसभेत सादर करण्यात आलं. केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी ही विधेयक मांडलं.

**राज्यसभा**

राज्यसभेत  काल वित्त विधेयक 2024, विनियोजन विधेयक आणि जम्मू आणि काश्मीर विनियोग विधेयक मंजूर करण्यात आल. या तिन्ही विधेयकांवर राज्यसभेत चर्चा झाल्यानंतर ती पुन्हा लोकसभेकडे पाठवण्यात आली. ही विधेयके लोकसभेत याआधीच  मंजूर करण्यात आली असून, यामुळे अर्थसंकल्प 2024-25 वरील कामकाज काल संसदेत पूर्ण झाल.

कोविडनंतर सरकार भांडवली खर्चात जास्तीत जास्त वाढ करत असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या चर्चेदरम्यान राज्यसभेत दिली. 2023-24 या आर्थिक वर्षासाठी प्रभावी भांडवली खर्च 15 लाख कोटीपेक्षा जास्त किंवा 18 टक्के असू शकतो, असं सीतारामन म्हणाल्या.

या विधेयकांवरच्या चर्चेची सुरुवात करताना काँग्रेसचे खासदार विवेक तनखा यांनी महिलांसाठी देशात विशेष कर आकारणीचे विशेष टप्पे नसल्याकडे लक्ष वेधलं. महिलांसाठी स्वतंत्र कार्य संकुलाची मागणीही तनखा यांनी केली. आयुर्विमा आणि आरोग्य विम्यावरचा 18 टक्के जीएसटी रद्द करण्याची मागणी तृणमूल काँग्रेसच्या खासदार डोला सेन यांनी केली. द्रमुकच्या कनिमोळी, आपचे संजय सिंह, बिजेडीचे देबाशीष समंतरा यांनीही या चर्चेत सहभाग घेतला.

**जयशंकर मालदिव**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून 3 दिवसांच्या मालदिव दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध सुधारून नव्या संधींचा शोध घेणं हा या दौऱ्यामागचा उद्देश आहे. जून मध्ये झालेल्या नव्या मंत्रीमंडळाच्या शपथ ग्रहण सोहळ्याला मालदिवचे राष्ट्रपती मोहम्मद मोईज्जू यांच्या उपस्थितीत भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांचा हा पहिलाच दौरा आहे. मालदिव भारताचा एक प्रमुख शेजारी असून हिंद महासागर हा दोन्ही देशांमधील महत्वपूर्ण भौगोलिक प्रदेश असल्याचं जयशंकर यांनी म्हटलं आहे. या संपूर्ण क्षेत्रात सुरक्षितता आणि विकास हे भारताचं प्रथम ध्येय असून परराष्ट्र मंत्र्यांचा हा दौरा आपापसातील संबंध दृढ करून, मदतीचे नवे मार्ग शोधून काढून मागील वर्षी निर्माण झालेल्या समस्यांचं निवारण करणं हा उद्देश असल्याचं एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**ऑलिंपिक नीरज**

पॅरिस ऑलिंपिक मध्ये भारताचा भालाफेक पटू नीरज चोप्रानं 89 पूर्णांक 45 मीटर भालाफेक करत रौप्य पदकावर आपलं नाव कोरलं. स्वातंत्र्योत्तर काळात ऍथ्लेटिक्समध्ये 2 पदकं जिंकणारा निरज हा पहिलाच भारतीय खेळाडू ठरला आहे. नॉर्मन प्रिचर्ड, सुशील कुमार, पी.व्ही.सिंधु आणि मनू भाकर नंतर एक पेक्षा जास्त वैयक्तिक पदकं जिकणारा नीरज हा पाचवा

भारतीय खेळाडू ठरला आहे, 2008 आणि 2012 मध्ये कास्य आणि रौप्य पदक जिंकणाऱ्या सुशील कुमार नंतर ऑलिंपिक मध्ये सलग 2 पदकं जिंकणारा नीरज दूसरा भारतीय ठरला आहे. या सामन्यात पाकिस्तानच्या अर्शद नदीम यानं 92 पूर्णांक 97 मीटर भालाफेक करत सुवर्ण पदक पटकावलं आहे.

दरम्यान राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पॅरिस ऑलिंपिक मध्ये रौप्य पदक मिळवल्याबद्दल नीरज चोप्राचं अभिनंदन केलं आहे. नीरज च्या या विजयामुळे भावी पिढीला प्रेरणा मिळणार असल्याचं राष्ट्रपति मुर्मू यांनी समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. तर नीरज नं पुन्हा एकदा आपल्या सर्वोत्तम प्रतिभेचं प्रदर्शन केलं असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही नीरजची प्रशंसा करताना त्याने तिरंग्याचा मान वाढवला असं आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघानं कास्य पदक पटकावलं आहे. काल झालेल्या कास्य पदकासाठीच्या लढतीत भारताने स्पेनचा 2-1 असा पराभव केला. या विजयानंतर भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच विविध केंद्रीय मंत्र्यांनी भारताच्या पुरुष हॉकी संघाचं अभिनंदन केलं आहे.

**बक्षीस**

ऑलिम्पिक मध्ये भारताला कांस्य पदक मिळून दिल्याबद्दल भारताच्या पुरुष हॉकी संघाला हॉकी इंडियाने बक्षीस जाहीर केल आहे. संघातील प्रत्येक खेळाडूला 15 लाख रुपये तर संघाच्या सहकारी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी साडेसात लाख रुपायांच बक्षीस देण्यात येणार आहे. भारताला ऑलिम्पिक मध्ये 52 वर्षांनी सलग दुसऱ्यांदा कास्य पदक मिळालं आहे.

**जपान भूकंप**

जपानला काल 7 पूर्णांक 1 रीखटर् स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपग्रस्त भागाजवळच्या आण्विक संयंत्राला या भूकंपामुळ कोणतीही हानी झाली नसल्याचं स्थानिक माध्यमांनी सांगितलं. या भूकंपानंतर बुलेट ट्रेन सेवा थांबवण्यात आली आहे.

# याबरोबच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.